# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६.०९.२०२४ ( गुरूवार )**

---

**फार्म हाउस सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड**

**एकुण १२ आरोपीतांवर कारवाई, नगदी ३६२३००/—रू तसेच ५ दुचाकी व ३ चारचाकी वाहनासह एकुण १७,८९,३००/— मुद्देमाल जप्त, नागपुर ग्रामीण पोलीसांची धडाकेबाज कारवाई**

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक २६.०९.२०२४ रोजी रात्री ०१/१५ वा मा. श्री अनिल म्हस्के भापोसे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, आमगाव शिवार तालुका रामटेक जि नागपुर येथे एका फार्महाउस मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध जुगार सुरू असुन तिथे काही इसम तासपत्त्यावर पैसे लावुन हारजीत चा जुगार खेळत आहे. मा. श्री अनिल म्हस्के भापोसे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांनी तात्काळ सदरची माहीती नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से) यांना दिल्याने त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार श्री अनिल म्हस्के भापोसे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक यांनी सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर, खापा, केळवद येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा विशेष पथक तयार केला. व सदर पथकासह आमगाव शिवार येथे रवाना झाले असता, किस्मत पान पॅलेस जवळ असलेल्या परीसरामध्ये एका फार्महाउस मध्ये लाईट सुरू असल्याचे व त्याबाहेर मोटर सायकल व चारचाकी वाहने उभी असल्याने नमुद पथकाने तेथे छापा घातला असता काही इसम तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा खेळ खेळतांना मिळुन आले. काहींना जागीच पकडण्यात आले. तरी काही इसम हे पोलीसांना पाहुन पळुन गेले. यातील आरोपी नामे—१) **दिनेश रमेश खीचर वय ४४ वर्ष रा आंबेडकर वार्ड रामटेक** याला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये ३२०००/—रू रोख व एक नथिंग कंपनीचा मोबाईल तसेच सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र २) नामे— **हीरालाल सुभाजी गपडपायले वय ६५ वर्ष रा. वार्ड बालाघाट मध्यप्रदेश** यांचे ताब्यातुन कि २०५००/—रू रोख, एक रिअलमी कंपनीचा मोबाईल फोन मिळुन आला. आरोपी क्र ३) नामे— **रतिराम शंकर मोटघरे वय २२ वर्ष रा भोरदेव कुही, हमु खरबी नागपूर** यांचे जवळुन रोख १५७००/—रू एक आयफोन मोबाइल तर दुसरा विवो कंपनीचा मोबाईल मिळुन आले. आरोपी क्र ४) नामे **असलम वल्द सलीम खान वय ५२ वर्ष रा. बालाघाट मध्यप्रदेश** यांचे ताब्यातुन २०२००/—रू व एक वन प्लस कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र ५) नामे— **दिपक प्रेमलाल पसीने वय ५३ वर्ष रा भंडारा** यांचे ताब्यातुन ३०७००/—रू आणि एक नोकीया कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र ६) नामे— **आकाश गणेश अहीरकर वय २६ वर्ष रा. विनोबा भावे वार्ड, रामटेक** यांचे ताब्यातुन रोख १०६००/—रू तसेच एक विवो कंपनीचा मोबाईल आरोपी क्र ७) नामे— **प्रशांत पुरूषोत्तम उराडे वय ३५ वर्ष रा. शनिवारी वार्ड रामटेक** यांचे ताब्यातुन ३६२००/—रू , एक आयफोन व दुसरा वन प्लस कंपनीचा मोबाईल मिळुन आला. आरोपी क्र ८) नामे— **रामकुमार उसालु बंदेवार वय ४० वर्ष रा. आंबेडकर वार्ड शिवनी मध्यप्रदेश** यांचे ताब्यातुन १३३००/—व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल ९) **विवेक ईश्वरीप्रसाद श्रीवास्तव वय ४५ वर्ष रा. शिवनी मध्यप्रदेश** यांचे ताब्यातुन २०९००/—रोख व एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन आरोपी क्र १०) नामे— **बंटी किशोर खीचर वय ३९ वर्ष रा कामठी जि नागपुर** यांचे ताब्यातुन १६७००/—रू आणि एक विवो कंपनीचा मोबाईल फोन, आरोपी क्र ११) नामे— **यमल श्रीराम राउत वय २५ वर्ष रा. आराध्यानगर नागपुर,** यांचे ताब्यातुन ३५१००/—रू रोख व एक विवो कंपनीचा मोबाईल, आरोपी क्र १२) **महेश भैयाजी वरघट वय ४० वर्ष रा रामटेक,** यांचे ताब्यातुन ११८००/—व एक वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन, या सर्वासमोर ५२ तासपत्ते व ९८२००/—रू मिळुन आले. असा एकुण **नगदी ३६२३००/—रू आणि ५२ तासपत्ते** पंचासमक्ष जप्त करण्यात आले. तसेच घटनास्थळी एक काळया रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल व एक सिल्वर रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल मिळुन आले. घटनास्थळाच्या बाहेर उभ्या असलेले वाहन क्र. १) बजाज पल्सर कंपनी ची दुचाकी क्र एम एच ४० सीएल ८८६२ क्र २) होंन्डा ॲक्टीवा दुचाकी क्र एम एच ४० बीएम २९९२ ३) हीरो स्प्लेंडर दुचाकी क्र एम एच ३६ टी ६४८४ क्र ४) होंडा ॲक्टीवा दुचाकी क्र एम एच ४० बीएम ५४३५ क्र ५) बजाज एव्हेंजर दुचाकी क्र एम एच ४० एवाय १६९७ क्र ६) मारोती ब्रिझा चारचाकी वाहन क्र एम एच ४० ५४११

७) मारोती सुझुकी एक्सप्रेस चारचाकी वाहन क्र एमएच ४० सीएच २७३२ क्र ८) एक विना नंबर ची टाटा झेस्ट पांढ—या रंगाची चारचाकी वाहन असा **एकुण १७ मोबाईल फोन किंमती ७७,०००/—रू, ०५ दुचाकी वाहन किमती २,५०,०००/—रू, चारचाकी वाहन —३ किमती ११,००,०००/—रू एकुण १४,२७,०००/—रू चा अणि १२ आरोपीकडुन मिळालेली रोख रक्कम ३,६२,३००/— असा एकुण १७,८९,३००/— मुद्देमाल** पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर फार्म हाउस हे दिनेश खिचर यांचे मालकीचे असल्याची प्राथमीक माहीती पोलीसांना हाती लागली.

पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी पोलीस स्टेशन खापा यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ४,५, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहे. कलम ११२ भान्यास मधील **किरकोळ संघटीत गुन्हेगारी** या कलमानुसार तपास करण्याचे प्रस्तावीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे) व अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री. रमेश धुमाळ, यांचे मार्गदर्शनात मा. श्री अनिल म्हस्के (भापोसे) तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहायक पोलीस अधिक्षक, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी ठाणेदार खापा, पोलीस उपनिरीक्षक बाळु राठोड पोस्टे सावनेर, पोहवा सुधिर यादगिरे पोस्टे केळवद, पोलीस अंमलदार सतिश देवकते, किशोर राठोड, रनधीर गेडाम पोस्टे सावनेर, यांनी यशस्वी रित्या पार पाडली.

**जुगार खेळणा—यांकडुन जप्त केलेले साहीत्य व रोख रक्कम**





## अवैधरित्या जुगार खेळणा—या इसमांवर कारवाई

पोलीस स्टेशन काटोल येथे दिनांक २५.०९.२०२४ रोजी स्थागुशा चे पथक पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, बस स्टॅन्ड काटोल जवळील ठक्कर कॉम्प्लेक्स समोर रोशन पांडे नावाचा इसम लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे व वरली मटक्यांचा जुगार खेळत आहे. नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड केली असता श्री चक्रधरस्वामी पान पॅलेस समोरील सार्वजनिक जागी रोशन रमेशराव पांडे वय ४६ वर्ष रा वार्ड क्र २, धंतोली पार्क जवळ, काटोल जि नागपुर हा लोकांकडुन पैसे घेवुन कागदाच्या चिट्ठीवर आकडेमोड करतांना मिळुन आला. पोलीसांची रेड होताच लगवाडी करणारे लोक पळुन गेले. रोशन पांडे याला ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये एक विवो कंपनीचा मोबाईल कि. ८०००/—रू नगदी ६२५०/—रू व सटटापटटी साहीत्य असा एकुण १४२५०/— रू चा मुद्देमाल मिळुन आला. सदर सट्टापट्टी गणेश श्यामराव पांडे वय ४० वर्ष रा गळपुरा काटोल याचे सांगण्यावरून लिहीतो असे सांगितले. सदर गुन्हयातील आरोपी नामे— **१. रोशन रमेशराव पांडे वय ४६ वर्ष रा वार्ड क्र २, धंतोली पार्क जवळ, काटोल जि नागपुर २. गणेश श्यामराव पांडे वय ४० वर्ष रा गळपुरा** यांचे कृत्य कलम १२ (अ) मजुका सहकलम ४९ बिएनएस अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पवन वाघमारे पोलीस स्टेशन काटोल मो. क्र ९८३४२८१४०१ करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे) व अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री. रमेश धुमाळ, यांचे मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक आशिषसिंह ठाकुर, पोहवा/दिनेश आधापुरे, ईकबाल शेख, चालक पोहवा आशुतोष ठाकुर यांनी पार पाडली.

## अकस्मात मृत्यु

पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक १०.०७.२०२४ चे १०.३० वा दरम्यान **मृतक नामे— विजय बापुराव ढोके वय ५३ वर्ष रा. खापरखेडा** हे एमएसईबी खापरखेडा येथे ठेकेदारी स्वरूपात करत असतांना ते आपले कामा—दरम्यान घोडीवर उभे राहुन एआयव्ही प्लॉट चे नट बोल्ट टाईट करत असताना त्यांचा अचानक पाय स्लिप होउन पडल्याने त्याचे डोक्याचे मागील बाजुस मार लागुन जखमी झाल्याने उपचार कामी MSEB हॉस्पिटल खापरखेडा नंतर आशा हॉस्पिटल कामठी रोड नागपुंर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान वार्ड चे एच.ओ यांनी तपासुन त्यांना दि. १३/०९/२०२४ चे रात्री ०८/३० वा. मृत घोषीत केले. सदर मृतकाचे कागदपत्र दि. १३.०९.२४ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे प्राप्त झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे सफौ कैलास पवार पो.स्टे.खापरखेडा यांचे रिपोर्टवरून मर्ग क्र ४९/२०२४ कलम १९४ बी.एन.एस.एस २०२३ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहे.

## प्राणांतिक अपघात

पोलीस स्टेशन देवलापार येथे दिनांक २३/०९/२४ चे १८/३० वा दरम्यान मौजा पवनी एन.एच.४४ हायवे सर्विस रोड वर यातील मृतक आरोपी नामे — **मोनु रतनसिंग नागरा वय २३ वर्षे रा.वार्ड क्र ०५ पवनी ता. रामटेक** हा आपली मोटर सायकल क्र एम.एच.४० बी.वाय ०६०७ वर चौबल सिट बसवुन वनपवनी वरून पवनीकडे भरधाव वेगाने जात असतांना, पवनी वरून वनपवनीकडे येत असलेल्या मोटर सायकल क्र एम.एच.३५ ए.पी.१३८५ ला समोरून जोरदार धडक दिली. त्यामुळे झालेल्या अपघातात मोटर सायकल क्र एम.एच ३५ ए.पी. १३८५ चा **चालक नामे —नरेशकुमार यादवसिंग उईके वय ४० वर्षे रा.आदर्श नगर शितलवाडी रामटेक ता. रामटेक याचे व स्वताचे मरणास** कारणीभुत ठरल्याने मेडीकल रिपोर्ट व चौकशी अहवाल सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे — सरतर्फे पो हवा राहुल रंगारी पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपीविरूध्द कलम २८१,१२५(अ), १०६(१) भा.न्या.सं. सहकलम १८४,१२८/१७७ मोटर वाहन कायद्यान्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री हरीहर सोनकुसरे पो.स्टे. देवलापार मो.नं ९०२१५४२९१८ हे करीत आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर जिल्हा ग्रामीण नागपुर